<u>**सत्र खटला क्र. ५३/२०२१**</u>

सरकार –वि– राहुल व ईतर

**निशाणी क्र. ८६**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | ज्ञानेश्वर रामदास खरात |
| वय | – | ४१ वर्षे |
| व्यवसाय | – | मजुरी |
| राहणार | – | वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना. |

<u>**सरतपास सरकारी वकील श्री. केसाळे यांचे मार्फत –**</u>

मला एक पत्नी व दोन मुले आहेत. माझी एक मुलगी नामे पुजा ही मयत झाली आहे. तिचे लग्न सन २०१८ मध्ये आरोपी क्र. १ राहुल सोबत झाले होते. आरोपी राहुल याला दारुचे व्यसन होते. आरोपी हा मयत पुजा हिला दारु पिवुन मारहाण करीत होता. घटना ही दिनांक १६/०२/२०२० रोजीची आहे. मयत पुजा हिने तिच्या घरी उंदीर मारण्याचे औषध खावुन आत्महत्या केली. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, सदरचे औषध तिने स्वतःहुन घेतले किंवा तिला खावु घातले याबद्दल माहिती नाही. त्यानंतर, सासु आणि नणंद हे दोघी सुध्दा मयत पुजा हिला त्रास द्यायचे. मयत पुजा हिला विष प्राशन केल्यानंतर माझी पत्नी नामे संगिता आणि पुजाचा चुलत मामा सचिन सुभाष तोडे यांनी दुचाकीवर बुलडाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे आणले. त्यावेळेस ती शुध्दीवर होती. रुग्णालयात भरती असतांना उपचारादरम्यान तिचा दोन ते तीन दिवसानंतर मृत्यु झाला. त्या संबधीची तक्रार पोलीस स्टेशन, धाड येथे दिली होती. आता मला फिर्याद दाखविण्यात आली, ही तिच आहे, त्यावर माझी सही आहे, त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादला <u>**निशाणी क्र. ८७**</u> देण्यात येते. त्या अनुषंगाने छापील प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आला. आता मला छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला, हा तोच

आहे, त्यावर माझी सही आहे, त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. छापील प्रथम खबरी अहवालाला **निशाणी क्र. ८८** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते. मला आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज न्यायालयात आरोपी क्र. २ ते ४ हजर आहेत. आरोपी क्र. १ राहुल मयत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. सानप यांच्या मार्फत –**

२. हे म्हणणे खरे आहे की, पुजा ही तिचा मृत्यु होईपर्यंत बोलत होती. हे म्हणणे खरे आहे की, पुजाच्या उपचारादरम्यान पोलीस तिला भेटायला आले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १६/०२/२०२० रोजी माझ्या मुलीने पोलीसांना दिलेल्या बयाणात हा मजकुर नमुद आहे, तो बरोबर आहे.

> *''सकाळी माझे पती दारु पिवुन घरगुती कारणावरुन माझे आणि माझ्या पतीमध्ये वाद झाल्यामुळे मला मानसिक टेन्शन आले त्यामुळे सकाळी अंदाजे ०७.०० वाजता घरामध्ये असलेले उंदिर मारण्याची औषधी मी घेतली आहे त्यामुळे मला मळमळ आणि उलट्या झाल्याने मी माझ्या आईला माहिती दिली. ती आली व मला सरकारी दवाखाना, बुलडाणा येथे घेवून आली आणि भरती केले असून उपचार सुरु आहे. सदरची उंदिर मारण्याची औषधी मी स्वतः घेतली आहे. मला कोणीही पाजले नाही असा जबाब मयत पुजा हिने पोलीसांना लिहुन दिला होता. त्यावर पोलीसांची सही आणि मयत पुजा हिच्या अंगठ्याचे निशाण आहे.''*

सदर भागाला **निशाणी क्र. ८९** देण्यात येते.

३. हे म्हणणे खरे आहे की, विष प्राशन केल्यानंतर उपचारादरम्यान तीन दिवसानंतर ती मयत झाली. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ संजय त्याला टि.बी.चा आजार झाल्यामुळे तो बुलडाणा येथे टि.बी. हॉस्पीटलला भरती होती त्यामुळे, मला

संबंधित घटनेविषयी माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मयत पुजा हिला सासु आणि तिची नणंद त्रास द्यायची ही बाब माझ्या रिपोर्ट आणि बयाणामध्ये सुध्दा नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी मुलगी पुजा हिने विष प्राशन करुन आत्महत्या केल्याने आरोपीविरुध्द मला आकस निर्माण झाला होता. त्यामुळे मी सुड उगवण्याच्या उद्देशाने खोटा रिपोर्ट दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ ते ४ मयत पुजा हिला त्रास द्यायचे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत पुजा ही तिच्या घरी आनंदाने राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्रास देण्यासाठी त्यांच्या विरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

दि. १०/१२/२०२५

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा

**<u>सत्र खटला क्र. ५३/२०२१</u>**

सरकार –वि– राहुल व ईतर

**निशाणी क्र. ९०**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | विजय मारोती लोंढे |
| वय | – | ५१ वर्षे |
| व्यवसाय | – | वरिष्ठ तंत्रज्ञ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, धाड |
| राहणार | – | धाड, ता. जि. बुलडाणा. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्री. केसाळे यांचे मार्फत –</u>**

दिनांक २०/०२/२०२० रोजी पोलीस स्टेशन, धाड यांनी मला पंच म्हणून हजर राहण्यास सांगितले होते. त्यावेळी, माझ्या सोबत दुसरे पंच श्री. वाठोरे होते. त्याप्रमाणे मी मौजे गुम्मी या गावाला पोलीसांसोबत गेलो होतो. घटनास्थळ हे बोरकर यांचे घर होते. सदरचे घटनास्थळ हे टिनाचे छत असलेले आणि मातीच्या भिंती असलेले घर होते. घटनास्थळावरुन जाळलेले कपडे आणि माती जमा केली, मला ते दाखविल्यास मी ओळखु शकतो. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार करुन त्या पंचनाम्यावर माझ्या सह्या घेतल्या. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, हा तोच आहे, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्याला **<u>निशाणी क्र. ९१</u>** देण्यात येते.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. सानप यांच्या मार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. ९१ वरील घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष जळालेले कपडे आणि

जळालेली माती जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

दि. १०/१२/२०२५ समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा

**<u>सत्र खटला क्र. ५३/२०२१</u>**

**निशाणी क्र. ९२**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | संगिता ज्ञानेश्वर खरात |
| वय | – | ३९ वर्षे |
| व्यवसाय | – | घरकाम |
| राहणार | – | धाड, ता. जि. बुलडाणा. |

**<u>सरतपास सरकारी वकील श्री. केसाळे यांचे मार्फत –</u>**

मयत पुजा ही माझी मुलगी होती. तिचे लग्न आरोपी क्र. १ राहुल बोरकर सोबत झाले होते. आरोपी क्र. १ तिला दारु पिवून मारहाण करायचा. मयत पुजा हिने तिच्या पतीसोबत वाद झाल्याने तिने उंदीर मारण्याचे औषध खावुन आत्महत्या केली. मी तिला दवाखान्यात माझ्या भावासोबत बुलडाणा येथे घेवून आली होती. उपचारादरम्यान तिचा तीन दिवसांनी मृत्यु झाला. आरोपींविरुध्द घटनेचा रिपोर्ट माझ्या पतीने पोलीस स्टेशन, धाड येथे दिला होता. मी आरोपींना ओळखते. ते आज न्यायालयात हजर आहेत. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. सानप यांच्या मार्फत –</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहीता, वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ सोबत मयत पुजा हिचा वाद झाल्याने तिने विष प्राशन केले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ ते ४ यांचा तिच्या विष प्राशन करण्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रकरणात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण</u>**

दि. १०/१२/२०२५ समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-

**( आर. के. शर्मा )**

जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश

बुलडाणा